# विठू माझा लेकुरवाळा... संगे गोपाळांचा मेळा!



एक एक श्वास, घेई दर्शनाचा ध्यास...

किलोमीटरचा पायी प्रवास करूनही त्यांच्या

# एसएसव्हीपीएस महाविद्यालयात 'सायबर जनजागृती' क्विक हिल फाऊंडेशनच्या माध्यमातून व्यापक उपक्रम

➤ धुळे । दै.मर्डर न्यूज

क्विक हिल फाऊंडेशन आणि एसएसव्हीपीएस सायन्स महाविद्यालय, धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' या सायबर सुरक्षा क्लबतर्फे एनसीसी कॅम्पमध्ये 'माय डेटा, माय रिस्पॉन्सिबिलीटी' या विषयावर सायबर जनजागृतीपर भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमास ५०० ते ६०० हून अधिक एनसीसी कॅडेट्स, एनसीसी अधिकारी, शिक्षक व मान्यवर उपस्थित होते.

सुरवातीला सायबर सुरक्षा क्लबच्या समन्वयक प्रा. डॉ. स्वाती बोरसे यांनी प्रास्ताविकातून क्विक हिल फाऊंडेशन, सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा संकल्पना तसेच सायबर सुरक्षेचे महत्त्व उपस्थितांसमोर विशद केले. त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून या संपूर्ण कार्यक्रमाची प्रभावी तयारी करून घेतली.

याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ॲड. रोहित कोहक, मानसोपचार तज्ज्ञ भावना पाटील, सखी वन स्टॉप सेंटरच्या ॲड. गायत्री भामरे उपस्थित होते. तसेच प्राचार्य प्रा. एम. व्ही. पाटील, उपप्राचार्य प्रा. के. एम. बोरसे आणि कर्नल सुदीप मिश्रा यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमाच्या प्रारंभी उपप्राचार्य प्रा. के. एम. बोरसे यांनी उपस्थितांचे स्वागत केले.



कार्यक्रमात 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' सायबर सुरक्षा क्लबच्या विद्यार्थ्यांनी 'माय डेटा, माय रिस्पॉन्सिबिलीटी' या विषयावर प्रभावी नाटीका (स्किट) सादर केले. या नाटिकेद्वारे ओटीपी फ्रॉड, डिजीटल अ‍ॅरेस्ट, सेक्सटॉर्शन, क्यू आर कोड स्कॅम, फेक लिंक तसेच इतर सायबर फसवणुकींबाबत प्रभावी जनजागृती करण्यात आली. त्यानंतर आयोजित सायबर क्विझमध्ये एनसीसी कॅडेट्सनी उत्स्फूर्त सहभाग घेत अचूक उत्तरे देत कार्यक्रमात रंगत आणली.

यावेळी प्राचार्य प्रा. एम. व्ही. पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत सायबर सुरक्षेची माहिती स्वतःपुरती मर्यादित न ठेवता ती आपल्या कुटुंबीय, मित्रपरिवार आणि समाजापर्यंत पोहोचविण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाच्या शेवटी कर्नल सुदीप मिश्रा यांनी आभार प्रदर्शन केले. त्यांनी विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या नाटीकेचे, त्यांच्या आत्मविश्वासाचे आणि सायबर जनजागृतीसाठी केलेल्या उत्कृष्ट कार्याचे विशेष कौतुक केले.

सदर सायबर जनजागृती कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी सायबर सुरक्षा क्लबच्या अध्यक्ष पूजा देवरे, सचिव ओम सोनार, -ॲक्टीव्हीटी डायरेक्टर नंदिनी सोनवणे आणि मीडिया डायरेक्टर हिमांशू रघुवंशी यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच प्रा. रूपाली पाटील, प्रा. वर्षा पाटील, प्रा. सविता पाटील, प्रा. अश्विनी पाटील आणि प्रा. सायली नंदन यांचेही मोलाचे सहकार्य लाभले. या यशस्वी उपक्रमाबद्दल संस्थेचे अध्यक्ष कुणाल पाटील तसेच उपाध्यक्ष बापूसाहेब एस. टी. पाटील यांनी सायबर सुरक्षा क्लबच्या विद्यार्थ्यांचे, समन्वयक प्रा. डॉ. स्वाती बोरसे आणि संपूर्ण टीमचे अभिनंदन करून त्यांच्या कार्याचे कौतुक केले.